http://www.epitomejournals.com Vol. 4, Issue 5, May 2018, ISSN: 2395-6968

Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# मर्ढेकरांची कविता : काही प्रतिमा



**प्रा.डॉ.खंदारे बी.बी.**
विभाग प्रमुख, मराठी
बहिर्जी स्मारक महाविद्यालय,
वसमत जि.हिंगोली

## ABSTRACT

आधुनिक काव्याच्या इतिहासात केशवसूतांनंतर वाङ:मयाच्या इतिहासात नवकवितेचे प्रवर्तक म्हणून ज्यांचा विचार केला गेला असा प्रज्ञा-प्रतिभावंत कवी म्हणजे मर्ढेकर होत. मर्ढेकर सुर्वे ढसाळ अशा तीन कवीची कविताच खऱ्या अर्थाने कालसंगत जीवन -जाणिवेची कविता म्हणून विचारात घ्यावी लागते. पण पैकी सुर्वे आणि ढसाळ स्वातंत्र्योतर काळातील कवी होत त्यांचा विचार त्या काळाच्या पार्श्वभूमिवर करण गरजेचे ठरते, इथे अप्रस्तुत ठरणारे आहे, परंतु महान प्रतिभावंतांच्या प्रतिभा ज्ञानाचा विचार केल्यास एखादाच असा कवी असतो की त्यालाच म्हणून की काय त्याच्या अवतीभोवतीच्या मानवी सहजीवनांचे सम्यक आणि सजग भान आलेले असते.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR All rights reserved.